# मोटार अपघात दावा अर्ज क्र. ४९/२०२० मधील नि.६ खालील आदेश

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.२७.१२.२०१९ रोजी रात्री ०९.३० वाजताचे सुमारास अर्जदार क्र. १ यांचे पती, अर्जदार क्र. २ यांचे वडील आणि अर्जदार क्र. ३ व ४ यांचा मुलगा सुरज शहाजी कदम, रा. मठाची वाडी, ता. फलटण, जि. सातारा हे फलटण–बारामती रस्त्याने मोटार सायकल क्र. एम.एच.११.बी.एम.३२९५ वरुन प्रवास करत असताना मौजे सोमंथळी, ता.फलटण, जि.सातारा गावचे हद्दीत श्रीदत्त दुध शितकरण केंद्र, पाटील वस्ती समोर सामनेवाला क्र. १ याच्या मालकीचा ट्रक क्र. आर.जे.१७जी.ए.६४०९ च्या चालकाने ट्रक निष्काळजीपणे, भरधाव वेगाने चालवून सुरज शहाजी कदम प्रवास करत असलेल्या मोटार सायकलला धडक दिल्याने अपघात झाला आणि त्या अपघातामध्ये सुरज शहाजी कदम गंभीररित्या जखमी होऊन मयत झाले. अपघाताचे वेळी ट्रक क्र. आर.जे.१७जी.ए.६४०९ सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीचा होता आणि या वाहनाचा विमा सामनेवाला क्र.२ युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. या विमा कंपनीकडे उतरविलेला होता. त्यामुळे सामनेवाला क्र. १ व २ हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

३. सामनेवाला क्र. १ यांचेवर नोटीसची बजावणी होऊनही ते हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द अर्ज एकतर्फा चालणेबाबतचा आदेश पारीत करणेत आला. सामनेवाला क्र. २ यांनी निशाणी १३ लगत म्हणणे दाखल केले आहे.

४. अर्जदारांनी यादी नि. ४ सोबत हजर केलेले अपघातासंबंधीचे फलटण ग्रामिण पोलीस ठाणे मधील दि.२८.१२.२०१९ रोजी नोंदविलेल्या गु.र.क्र.५९९/२०१९ मधील प्रथम वर्दि अहवाल, घटनास्थळ पंचनामा यावरुन अर्जदाराच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहने त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या विमा प्रमाणपत्राची प्रत सकृतदर्शनी असे दर्शविते की, ट्रक क्र. आर.जे.१७जी.ए.६४०९ चा सामनेवाला क्र.३ यांचेकडे सामनेवाले क्र.२ यांनी मालक या नात्याने दि.५.१.२०१९ ते ४.१.२०२० या कालावधीसाठी विमा उतरविलेला होता. अपघाताचे दिवशी सदरहू वाहन सामनेवाला क्र.२ यांच्याकडे विमा संरक्षित होते.

६. अर्जदार यांनी हजर केलेल्या मरणोत्तर पंचनामा यावरुन असे स्पष्ट होते की, सुरज शहाजी कदम यांचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाले क्र.१ व २ हे स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ व २ यांनी स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसांचे आत अर्जदार क्र. १ यांना रेखांकित धनादेशाने द्यावेत. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला क्र.१ व २ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा.
दिनांकः १०.१०.२०२२

( मंगला ज. धोटे )
अध्यक्षा, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.